

# सुस्वागतम




**DEPARTMENT OF MARATHI** **मराठी विभाग**

**ESTABLISHED IN 1994**

## Vison:-


To Develop Best Citizens Through Marathi Language and Literature.

मराठी भाषा आणि साहित्य यांच्याद्वारे उत्तम नागरिक तयार करणे.

## Mission:-

To create the sence among the students regardings social,educational,cultural life and Marathi Litrature.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक ,शेक्षणिक ,सांस्कृतिक जीवन आणि मराठी साहित्य विषयक आवड निर्माण करणे.To make availabale the best qualitative literature in Marathi.मराठी भाषेतील दर्जेदार साहित्य विद्यार्थ्याना उपलब्ध करून देण




# Faculty Profile

| Sr. No. | Name of Faculty | Qualification | Designation | Exp. In Year | Specialization |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr. Patil V.S. | M.A.B.Ed,NET,B.J., Ph. D. | H.O.D.& Assistant Professor | 13 | Folk Literature |
| 2 | Dr. Dabhade B. T. | M.A.,Ph. D. | Assistant Professor | 21 | Adhunik Marathi Sahity |

# Doctoral Research

| Sr. No | Name Of Researcher | Area of Specializatio n | Title | University | Position |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr.B.T.Dabhae | Marathi Niyatkalik | Prabhodhan Parkashan Jyoti Niyatkalikacha Chikitsak Abhyas (1990 TO 2007) | University Of Mumbai | Awarded Ph.D. (2016) |
| 2 | Dr. V.S.Patil | Marathi Folk Litearature | Dakshin Konkanatil Dantakathancha Chikitsak Abhyas | Shivaji University Kolhapur | Awarded Ph.D. (2019) |

# RESEARCH PUBLICATIONS

**Dr.Vikas Shankar Patil**

**(Research Papers : 18**

**All papers are published in UGC Care Listed(08) and Peer Reviewed Journals(10)**

**Dr.Balavant Tukaram Dabhade**

**(Research Papers:08**

**(All papers are published in UGC Care Listed(1) and Peer Reviewed Journals(7))**

**Research Paper Presented In Seminars : 02**

**Chapters in Book Published: 07**


## Published Article in Newspapers: 48 (Jan Riti Bhati - 48 & Katha Dantkatha-01)


## MINOR RESEARCH PROJECT

| Name of the Faculty | Title | Major/ Minor | Funding Agency | Amount in Rs. | Period |
|---|---|---|---|---|---|
| Dr.Vikas S.Patil | Pachal Parisaratil Loksahityaca Abhyas | Minor | Mumbai University | 35000 | 2018-19 Completed |


**PUBLICATIONS** | Faculty











# Students Publication





अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | ती | प्रा. स्नेहल गोविंद चव्हाण |
| २) | आयुष्य | सायली संतोष गुरव |
| ३) | आई | सायली पवार |
| ४) | वणवा | रेश्मा राया कस्तुरे |
| ५) | वाली उभ्या जगाचा भीमराव | रोशन रिंगणेकर |
| ६) | सहवास मैत्रीचा | ज्योती गंगाराम कांबळे |
| ७) | सुवर्ण महोत्सव आणि सद्य परिस्थिती | तृप्ती कुरुप-पाटोळे |
| ८) | भय इथले संपले का ? | आकाश परब |
| ९) | नेमके काय करायचे राहिले | सायली पवार |
| १०) | शंभुराजे | श्वेता राजन जाधव |
| ११) | अबोल डोळे | आकांक्षा जगन्नाथ जाधव |
| १२) | माझा भारत देश महान | आकांक्षा जगन्नाथ जाधव |
| १३) | मानवाची ही प्रगती की अधोगती ? | रेश्मा प्रकाश नामये |
| १४) | छत्रपती शिवाजी महाराज | प्रणव लक्ष्मण कोलगे |
| १५) | माझी शाळा | खुशी विनायक सोडये |
| १६) | आपलं कोकण | वेदांत विलास नामये |
| १७) | माझ्या अंगणात | रोहन अशोक पाल्वे |
| १८) | पाऊस आला... | श्रुतिका श्रीकांत पाटील |
| १९) | आंब्याची शाळा | रोहन अशोक पाल्वे |
| २०) | आई | साक्षी संजय भोवड |
| २१) | माझा भाऊ | खुशी सुहास नामये |
| २२) | सुंदर आमचे जावडे गाव | तुषार चंद्रकांत शिंदे |
| २३) | गुढी | अंतरा अमोर सुर्वे |

# Workshop Organized by Marathi Department

**Marathi Drpartment**

**Orginazed**

**One Day Workshop**

**On**

**“New Re-composition of  Marathi Syllabus”**

on 17 Julle 2018






उदघाटन प्रसंगी दीपप्रज्वलन करतांना डॉ.धनाजी गुरव    बीजभाषण करतांना डॉ. धनाजी गुरव

MARATHI
WHARK SHOOP
17/07/2018






प्रमाणपत्र वितरण करतांना संस्थाध्यक्ष श्री.मनोहरजी खापणेसाहेब शब्दालय प्रकाशनाने मांडलेले पुस्तक प्रदर्शन

# Students Enrichment Programmes

Organization of Guest Lectures

Essay Competition

Organization of Guest Lectures

Guest Lectures – 'Lekhak aaplya Bhetila'

Publication of Spandan

Folk Literature Collection

Students Publication

Marathi Bhasha Gaurav Din

Self Written Poetry Reading

'Lokranjan', May, Mayboli, Sahitysamrat Wallpaper Publication

# SHRAVANDHARA







श्रावणधारा काव्यवाचन करतांना विद्यार्थी








**वाढदिवसानिमित्त ग्रंथभेट उपक्रम**



Writing Competition

**हस्ताक्षर स्पर्धेतील विद्यार्थिनीस गौरवताना**

**प्राचार्य**

**डॉ .के .एम .कोतवाल**






**संवाद वार्तापत्र प्रकाशन**

## Inauguration of ‘Maayiboli’ Wallpapers





**Inauguration ‘Maay’ Wallpapers**





माय  उद्घाटन करतांना प्राचार्य डॉ .के .एम .कोतवाल

माय  उद्घाटन करतांना प्राचार्य डॉ .पी .एस .मेश्राम





पुस्तक प्रदर्शन  उद्घाटन करतांना प्र. प्राचार्य डॉ.पी.एस.मेश्राम        पुस्तक प्रदर्श

Shekoticya Kavita






शकोटी काव्य संमेलन

**सकाळ**

# ‘शेकोटी काव्य संमेलना’त प्रेमाचे रंग

## खापणे महाविद्यालयातर्फे आयोजन ; विद्यार्थ्यांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

राजापूर, ता. २१ : मागील आठवड्यातील अवकाळी पावसानंतर गेल्या काही दिवसांपासून थंडीचा जोर वाढला आहे. सकाळच्यावेळी बोचऱ्या थंडीतून घराबाहेर पडणेही नकोसे वाटते. या स्थितीत तालुक्यातील रायपाटण येथील श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयामध्ये शेकोटीमध्ये 'शेकोटी काव्य संमेलन' रंगले. 'याच गुलाबी थंडीत आयुष्याचा सोबती मिळेल अन् थंडी आणि दिवाना आयुष्याचा भाग बनेल', अशा शब्दात गुलाबी थंडीमध्ये विद्यार्थ्यांनी काव्यपंक्तीद्वारे गुलाबी प्रेमाचे रंग भरले.

रायपाटण येथील श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयाच्या 'मराठी भाषा व वाङ्मय मंडळामार्फत' शेकोटी काव्य संमलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात विद्यार्थी मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. येल्लुरे यांच्या हस्ते शेकोटी पेटवून अनोख्या पद्धतीने या काव्य संमेलनाचे उद्‌घाटन झाले. मराठी भाषा आणि वाङ्मय मंडळाचे प्रमुख प्रा. डॉ. विकास पाटील आंनी काव्यसंमेलनाची प्रस्तावना करताना त्याच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांनी विविधांगी कवितांचे सादरीकरण करत आपल्या प्रतिभेचे पदर उलगडले. रेश्मा कस्तुरेने याच गुलाबी थंडीत आयुष्याचा सोबती मिळेल म्हणून तर थंडी आणि दिवाना आयुष्याचा भाग बनेल, अशा काव्यपंक्तीद्वारे थंडीत मिळालेल्या जीवन सोबतीची ओळख करून दिली. या वेळी कलिका जाधव, ज्योती कांबळे, पूनम जाधव, प्राची पडवळ, सायरा काझी, अरशिन गडकरी, समृद्ध कसपले, मंदिरा पवार, साहिल मोरे, प्रतीक्षा फटकारे, जागृती कोटकर, विक्रांत गांगण आदी विद्यार्थ्यांनी दर्जेदार कवितांचे सादरीकरण करत काव्यसंमेलनाची रंगत वाढवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विकास पाटील यांनी, तर आभार डॉ. बळवंत दाभाडे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद, विद्यार्थी उपस्थित होते.



राजापूर : शेकोटी काव्य संमेलनामध्ये कवितांचे सादरीकरण करताना खापणे महाविद्यालयाचे विद्यार्थी.

### शेतकऱ्यांच्या कष्टमय जीवनावर कविता

कार्यक्रमात सायली पवार हिच्या 'शुभ्र धुक्यात हरवलाय काळा जर्द रस्ता, अशा थंडीतही खातोय बाप शेतामध्ये खस्ता', या काव्यपंक्तींनी शेतकऱ्याचे कष्टमय जीवन साऱ्यांच्या डोळ्यासमोर समोर उभे केले. ओंकार मांजरे याच्या काळ्या केसांचा धुक्यात झालाय कापूस, आईच्या हातांनाही सकाळी जाणवत नाही का थंडीचा स्पर्श ? ही कविता थंडीतही लेकरांसाठी कष्ट उपसणाऱ्या आईचे दर्शन घडवणारी होती.

Ratnagiri, Ratnagiri-Today
22/01/2024 Page No. 4

**वृषाली आठल्ये : पाचल येथील मनोहर हरी खापणे महाविद्यालयात कार्यक्रम; 'रांजण' भित्तीपत्रिकेचे उद्घाटन**

# मराठी भाषेला सन्मान देण्याचा प्रयत्न करूया

लोकमत न्यूज नेटवर्क

पाचल : मराठी राज्यभाषा व्हावी म्हणून वि. वा शिरवाडकरांनी आयुष्यभर प्रयत्न केले. मराठी भाषेला सन्मान मिळावा म्हणून त्यांनी चालवलेली मराठी राजभाषेची चळवळ आजही ताकदीने पुढे घेऊन जाण्याची गरज आहे. वि. वा. शिरवाडकरांबरोबरच मराठीतील दर्जेदार साहित्याची जगाला ओळख करुन देण्याची गरज आहे. आता आपण सर्वांनीच न थांबता मराठीच्या उन्नतीसाठी शिरवाडकरांची विचारधारा पुढे नेऊया व मराठीला सन्मान देण्याचा प्रयत्न करुया', असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक वृषाली आठल्ये यांनी केले.

त्या पाचल येथील मनोहर हरी खापणे महाविद्यालयात 'मराठी भाषा व वाङ्मय मंडळ' आयोजित मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात 'वि. वा. शिरवाडकर : साहित्य विचारधारा' या विषयावर प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर कार्यालयाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ए. डी. पाटील, प्रा. डॉ. बी. टी. दाभाडे, मुख्य लिपीक नरेश पाचलकर, स्नेहा कोलते होते. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन झाली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

त्यानंतर परिसरातील लोकसाहित्याचे संकलन करुन विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'रांजण' या अनोख्या भित्तीपत्रिकेचे उद्घ[...] आठल्ये यांच्या हस्ते करण्यात आ[...] प्रा. डॉ. बी. टी. दाभाडे य[...] प्रास्ताविक केले. या कार्यक्रम[...] सूत्रसंचालन प्रा. डॉ. बी. टी. दा[...] यांनी केले तर प्रा. बी. ए. कश्यप या[...] आभार मानले. यावेळी विद्या[...] उपस्थित होते.



पाचल येथील मनोहर हरी खापणे महाविद्यालयात वृषाली आठल्ये यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रभारी प्राचार्य ए. डी. पाटील, डॉ. बी. टी. दाभाडे, बी. ए. कश्यप उपस्थित होते.

- मराठी भाषादिनानिमित्त महाविद्यालयात व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन केले हो[...]
- शिरवाडकरांबरोबरच मराठीती[...] दर्जेदार साहित्याची जगाला ओळख करुन देण्याची गरज.
- परिसरातील लोकसाहित्याचे संकलन करुन विद्यार्थ्यांनी रां[...] भित्तीपत्रिका तयार केली.
- मराठी भाषा व वाङ्मय मंडळातर्फे कार्यक्रमाचे आयो[...]

सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय

पाचल-रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

## आय.क्यू.ए.सी. व मराठी भाषा व वाङ्‌मय मंडळ आयोजित

# राज्यस्तरीय ऑनलाईन अनुभव लेखन स्पर्धा २०२०

२५ मार्च २०२० रोजी देशव्यापी लॉकडाऊन सुरू झाला आणि सर्वांचीच दैनंदिनी बदलून गेली. कोरोनाचा विस्फोट सुरूच आहे. शहर असो वा खेडे आज सगळीकडेच कोरोना रुग्णांच्या संख्येत प्रचंड वाढ होताना दिसत आहे. सर्वच ठिकाणी अस्वस्थ करणारे अनुभव पहायला, ऐकायला मिळत आहेत. सगळीकडेच असुरक्षिततेचे असणारे वातावरण, वैद्यकीय व्यवस्थेविषयी समाजात निर्माण झालेले समज-गैरसमज, कोरोनाच्या महामारीतही जगण्यासाठी करावी लागणारी गोरगरिबांना धडपड, कोरोनाच्या भीतीने मनाची होणारी अवस्था, कोरोना पेशंट म्हणून अनुभवलेले क्षण, कोरोना पेशंटच्या कुटूंबावर समाजाकडून लादले जाणारे अस्पृश्यपण, रस्त्यावर अपघातात दम तोडणारे पेशंट असे अनेक अनुभव आपल्या अवतीभोवती घडत आहेत. तुम्हाला विचार करायला लावणाऱ्या या अनुभवांना शब्दबध्द करुन आमच्याकडे पाठवा. ही अनुभव लेखन स्पर्धा तुमच्या मनातील शब्दकल्लोळाचे शब्दांकन असेल. मग आता उचला लेखनी आणि तुमच्या मुक अनुभवांना द्या शब्दरुप. ही स्पर्धा म्हणजे तुमच्या रसरशीत अनुभवांना व्यक्त करण्याची सुवर्ण संधी!

### *स्पर्धेचे नियम*

१) आपल्या अनुभवाचे लेखन मराठी भाषेतूनच करावे.
२) अनुभवाची शब्द मर्यादा कमीत कमी ५०० शब्द व जास्तीत जास्त ६०० शब्द इतकी राहिल.
३) आपला अनुभव टाईप करून किंवा स्वच्छ हस्ताक्षरात लिहून त्याचा स्पष्ट दिसेल असा फोटो काढून पाठवावा.
४) आपला अनुभव पाठवण्याची अंतिम तारीख २०/१०/२०२० ही असेल.
६) आपला अनुभव हा कोरोना कालावधीतीलच असावा.
७) आपला अनुभव vikaspatil997@gmail.com या मेलवर पाठवावेत. सोबत आपला दूरध्वनी क्रमांक द्यावा.

### *पारितोषिके*

प्रथम क्रमांक : रु ७०१ व प्रशस्तिपत्र

द्वितीय क्रमांक : रु ५०१ व प्रशिस्तिपत्र

तृतीय क्रमांक : रु ३०१ व प्रशिस्तिपत्र

उत्तेजनार्थ ३ पारितोषिके

प्रत्येकी रु १०१ व प्रशस्तिपत्र




डॉ. के. एम. कोतवाल, प्राचार्य श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल - रायपाटण

*अधिक माहितीसाठी संपर्क*

डॉ. विकास पाटील - ९४०४२५६४३४ डॉ. बळवंत दाभाडे - ९४२११४२७५५



**कागल येथील राष्ट्रीय काव्यवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना प्रथमेश आंबेरकर**



शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर,
आणि
दि.कागल एज्युकेशन सोसायटी संचलित
डी.आर.माने महाविद्यालय, कागल
जि.कोल्हापूर
मराठी विभाग
आयोजित
राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन मराठी काव्यवाचन स्पर्धा

प्रमाणपत्र

दिनांक : ६फेब्रुवारी २०२१

श्री/श्रीमती. प्रथमेश प्राजक्ता प्रकाश आंबेरकर (मनोहर हरी खापणे महाविद्यालय, पाचल ता. रायपाटण) शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि डी.आर.माने महाविद्यालय, कागल आयोजित राष्ट्रीय स्तरावरील आंतरमहाविद्यालयीन ऑनलाईन काव्यवाचन स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त [illegible] बद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

डॉ.प्रकाश दुकळे | डॉ.शिवकुमार सोनाळकर | विभाग प्रमुख डॉ.नीला जोशी | प्राचार्य डॉ.प्रवीण चौगले

पुढारी

# स्वातंत्र्यलढ्यात राजापूरचे योगदान

## डॉ. विकास पाटील : खापणे महाविद्यालयात कार्यक्रम

**राजापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारताला मिळालेल्या स्वातंत्र्यामध्ये स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान मोलाचे आहे. राजापूर तालुक्याचेदेखील फार मोलाचे योगदान स्वातंत्र्यलढ्यात आहे. तरुणाईने त्याचे सदैव स्मरण केले पाहिजे, असे आवाहन मनोहर खरी खापणे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. विकास पाटील यांनी एका कार्यक्रमादरम्यान केले.

भारताच्या स्वातंत्रदिनाला ७५ वर्षे पूर्ण झाली असून, देशभरात अमृतमहोत्सवी वर्ष थाटामाटात साजरे केले जात आहे. याच अनुषंगाने खापणे महाविद्यालयात देखील मराठी भाषा आणि वाङ्‌मय मंडळाच्या विद्यमाने हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना राजापूर तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिक या विषयावर प्राध्यापक डॉ. विकास पाटील स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास उलगडला.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात राजापूर तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी खूप मोठे योगदान दिले आहे. सरकार दप्तरी राजापूर तालुक्यातील ३२ पेक्षा अधिक स्वातंत्र्यसैनिकांची नोंद आढळते. अण्णा वायकूळ, अण्णा लब्धे, आबा मलुष्टे, आबा नारकर, गोविंद मांजरेकर, सखाराम पवार, केशव नारकर, सहदेव ठाकरे, शोभना वायकूळ, शांताबाई तेंडुलकर, जानकीबाई शेटे, जानकीबाई तेंडुलकर अशा कितीतरी स्त्री आणि पुरुष स्वातंत्र्य सैनिकांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेऊन शिक्षा भोगली.


अशाच प्रकारचे लढे माडबन परिसरातील स्वातंत्र्य सैनिकांनी देशासाठी उभारले होते. पाचलप्रमाणेच माडबन गावदेखील स्वातंत्र्य सैनिकांची भूमी म्हणून ओळखली जाते. पाचल येथील आझाद टेकडीसह अन्य महत्त्वांच्या ठिकाणी स्वातंत्र्यासाठी लढा देणाऱ्या सैनिकांच्या गाठीभेटी व्हायच्या. तेथेच बैठका व्हायच्या. पुढील भूमिका ठरायच्या, असे मत डॉ. विकास पाटील यांनी व्यक्त केले.

आपल्या परिसरातील स्वातंत्र्य सैनिकांनी केलेल्या कार्याची सखोल माहिती घेऊन, त्याची चिकित्सक मांडणी तरुणाईने करून नवा इतिहास लोकांसमोर आणावा, असे आवाहन अध्यक्षीय मनोगतातून डॉ. पी. एस. मेश्राम यांनी केले. आभार प्रा. एस. डी. कांबळे यांनी मानले.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. बी. टी. दाभाडे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. बी. टी. दाभाडे यांनी केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक, नरेश पाचलकर व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

My Ratnagiri Edition
Aug 12, 2022 Page No. 2
newspaper.pudhari.co.in




ऑनलाईन व्याख्यान देताना डॉ. व्ही.एस. पाटील



## पुस्तक प्रदर्शन




**शेकोटी काव्य संमेलन 2023**

लोकमत

आगळ्या-वेगळ्या काव्य मैफलीत विद्यार्थ्यांचा उत्साह अधिक

# खापणे महाविद्यालयात शेकोटीच्या उबीत रंगली काव्य मैफल

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाचल :** गुलाबी थंडी, थंडगार वारा, त्यात कवितांचा वर्षाव अशा वातावरणात पाचल येथील मनोहर हरी खापणे महाविद्यालयात शेकोटी काव्य संमेलन रंगले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त मराठी भाषा व वाङ्मय मंडळातर्फे या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम यांच्या हस्ते शेकोटी पेटवून या संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले.

'थंडगार वारा आणि अंगावर शहरा' ही अंकिता धुळपची 'गुलाबी थंडी' ही कविता अंगावर प्रेमाचा शहारा आणत होती. तर सायली पवार हिची 'दिवस छोटा रात्र मोठी झाली' ही 'थंडीचे दिवस' कविता हिवाळ्यात निसर्गात होणारे बदल व्यक्त करत होती. रेश्मा कस्तूरेच्या 'थंडी' या कवितेतून थंडीची जाणीव पशुपक्ष्यांना, पाखरांनाही कशी होते याचा अनुभव व्यक्त करत होती.

पहाटे धावताना भेटलेली थंडी श्वेता इस्कार हिच्या कवितेतून व्यक्त होत होती तर यश नेवरेकरच्या 'गुलाबी थंडी' या कवितेतून याच हिवाळी गुलाबी थंडीत मला आयुष्यभराचा सोबती मिळाला. यावेळी श्रुती ताम्हणकर, प्रतीक्षा फटकारे, सुदर्श घागरे, सायली गुरव, सायरा काझी, अर्शिन गडकरी, दर्शिका गुरव, योजना गुरव, मतीन भयरी या विद्यार्थ्यांनी कविता सादर केल्या. या कवितांना उपस्थित विद्यार्थ्यांचाही तितकाच प्रतिसाद मिळाला. त्यामुळे काव्य मैफल अधिकच रंगतदार झाली होती.

त्यानंतर नरेश पाचलकर, प्रा. डॉ. बी. टी. दाभाडे, प्रा. एन. जी. देवन, प्रा. एस. व्ही. निंबाळकर यांनीही कविता सादर केल्या. डॉ. व्ही. एस. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. बी. टी. दाभाडे यांनी आभार मानले. या पंधरवड्यानिमित्त पुस्तक प्रदर्शन घेण्यात आले. त्याबरोबरच हस्ताक्षर स्पर्धा, मराठी भाषा गौरव गीत गायन, बोलू आणि लिहू मराठी उपक्रम, मायबोली भित्तिपत्रिका प्रदर्शन असे विविध उपक्रम घेतले जाणार आहेत.



राजापूर तालुक्यातील खापणे महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त शेकोटी काव्य संमेलनात श्वेत इस्कार हिने काव्यवाचन केले. यावेळी प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम व इतर शिक्षक उपस्थित होते. थंडीच्या वातावरणात घेण्यात आलेल्या या काव्य मैफलीत विद्यार्थीही रंगून गेले होते.

Hello Ratnagiri
Page No. 3 Jan 21, 2023
Powered by: erelego.com

## MoU : 03

**Rajapur ,Lanja Taluka Nagrik sangh ,Mumbai**

**Arts, Commerce & Science College, Phondaghat**

**N.D.Patil college, Malkhapur, Dis.Kolhapur**



**राजापूर लांजा तालुका नागरिक संघ मुंबई आयोजित ( तळवडे ) साहित्य संमेलनात विद्यार्थ्यांच्या स्वरचित ' काव्योदय ' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन दिनांक १२/०२/२०२२**




**राजापूर लांजा तालुका नागरिक संघ मुंबई नवव्या ग्रामीण साहित्य संमेलनात 'काव्यधारा' या विद्यार्थी स्वरचीत काव्यसंग्रहाचे प्रकाशन दिनांक ०३/०३/२०२४**

**Faculty Exchange Programme 0f Marathi Department**




## Activity Report for Malkapur College.




**मराठी भाषा पंधरवड्या निमित्त 'मराठी भाषेतून नोकरीच्या संधी' या विषयावर डॉ.बाळासाहेब सुतार यांचे व्याख्यान दि.15/01/2020**






# मराठीचा शब्दसंग्रह आणि गोडवा जपून मराठीला रोजगाराची भाषा बनवूया- डॉ.विकास पाटील

**पाचल (वार्ताहर)**

आज मराठी भाषेला पर्याय म्हणून इंग्रजी, हिंदी यासारख्या भाषा अधिक वापरल्या जात असल्या तरी मराठी भाषिकांनी मराठीचा शब्द संग्रह जाणून घेतला पाहिजे. एका 'डोळा' या शब्दावरून मराठीत तीस पेक्षा अधिक म्हणी आहेत. पाणी या शब्दावरूनही असेच म्हणींचे वैभव मराठीत दिसते. मराठीच्या या शब्दवैभवामुळेच व तिच्यातील गोडव्यामुळे मराठी भाषा अमराठी भाषिकांनाही आपलीशी वाटते. आज ई मीडियावर मराठीचा मोठ्या प्रमाणात वापर तरुणाईने करणे आवश्यक आहे. संगणकावर अधिकाधिक मराठी भाषा वापरली जावी. शासनाने ही या राजभाषेला रोजगाराची भाषा बनवावी. यापुढे आपण सर्वांनीच मराठीचा शब्दसंग्रह आणि गोडवा जपून मराठीला रोजगाराची भाषा बनवूया " असे आवाहन डॉ. विकास पाटील यांनी केले. ते श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयात 'मराठी भाषा व वाङमय मंडळ 'आयोजित मराठी भाषा पंधरवड्या निमित्त आयोजित 'मराठीचे वैभव आणि स्थिती ' या विषयावर बोलत होते.




खापणे महाविद्यालयात मराठी भाषा पंधरवड्या निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ.विकास पाटील, अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र प्राचार्य डॉ.पी.एस. मेश्राम व उपस्थित मान्यवर.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम, डॉ. बी. टी. दाभाडे, प्रा. एस. एस. धोंगडे, प्रा. पी.पी. राठोड, प्रा. एम.डी. देवरुखकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून डॉ. बी.टी.दाभाडे यांनी मराठी भाषा पंधरवड्या निमित्त घेण्यात आलेल्या शेकोटी काव्य संमेलन, मायबोली भिंती पत्रिका, गटचर्चा, रांगोळी स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, मान्यवरांची व्याख्याने आदी संदर्भात माहिती दिली. " मराठी ही आपली मायबोली असून तिच्या संवर्धनासाठी आणि वाढीसाठी आपण सर्वांनी संघटित प्रयत्न करूया" असे आवाहन आपल्या अध्यक्षीय मनोगतातून प्रभारी प्राचार्य डॉ.पी.एस. मेश्राम यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सुजानी पांचाळ हिने तर आभार डॉ.बी. टी.दाभाडे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य,सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# मराठीचा वापर वाढवूया : बळवंत दाभाडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाचल** : मराठी ही आपली राजभाषा आहे. राजभाषा असूनही तिला आपण सन्मान देत नाही. आपण दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर वाढवला पाहिजे. आपल्या भाषेचा गौरव वाढवण्यासाठी आणि मायबोलीच्या संवर्धनासाठी आपण मराठी भाषेचा वापर वाढवूया, असे आवाहन डॉ. बळवंत दाभाडे यांनी केले.

ते राजापूर तालुक्यातील पाचल येथील श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयात मराठी भाषा व वाङ्मय मंडळ आयोजित मराठी राजभाषा दिन कार्यक्रमात बोलत होते. ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राबरोबरच गोवा, मध्य प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक या राज्यांबरोबरच जगभरात अनेक ठिकाणी मराठी भाषा बोलणारे लोक आहेत. मराठी भाषा आणि



संस्कृती सर्वदूर पोहोचली आहे. सोशल मीडियावर आपणाकडून मराठी भाषेचा वापर कमी होत चालला आहे. हा वापर वाढवून आपण मराठी भाषेचा प्रसार आणि प्रचार वाढवला पाहिजे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. एस. व्ही. निंबाळकर, मराठी भाषा व वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. विकास पाटील, प्रा. पवन राठोड उपस्थित होते. यावेळी मराठी राजभाषा दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती डॉ. विकास पाटील यांनी प्रास्ताविकप[र] मनोगतातून दिली. प्रा. एस. व्ही. निंबाळकर म्हणाले की, आप[ण] दुसऱ्यांच्या भाषेचे अनुकरण करत[ो]. आपण आपली भाषा अधिक वापरल्या[स] दुसराही आपल्या भाषेचे अनुकर[ण] करेल. आपण ज्यांना अशिक्षित स्त्रि[या] म्हणतो, त्या स्त्रियांनीही मौखिक परंपरे[ने] लोकसाहित्याचे जतन केले होते. याउल[ट] सुशिक्षित पिढी या साऱ्यापासून दूर जा[त] आहे. म्हणूनच आपण सर्वांनी [या] लोकसाहित्याचे जतन करूया आ[णि] मराठी भाषेचा गौरव वाढवूया, अ[से] आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाती[ल] प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थि[त] होते. डॉ. विकास पाटील यां[नी] सूत्रसंचालन केले तर प्रा. पी. पी. राठो[ड] यांनी आभार मानले.